46

क्रमांक/यजिप/साप्रवि/परिषद/2212/१४
यवतमाळ जिल्हा परिषद, यवतमाळ
(सामान्य प्रशासन विभाग)
यवतमाळ, दिनांक :- २२ सप्टेंबर २०१४

**प्रति,**

१) मा. श्री.--------------------------------------------------
अध्यक्ष / उपाध्यक्ष जिल्हा परिषद, यवतमाळ.

२) मा. श्री.--------------------------------------------------

सभापती, ---------------------समिती, जिल्हा परिषद, यवतमाळ

३) सन्मा. जि.प. सदस्य, श्री / श्रीमती -----------------------------------------

मुक्काम --------------------- पोष्ट -------------------

तालुका --------------------- जिल्हाः यवतमाळ.

मार्फत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती -----------------------

दिनांक १०.०७.२०१४ रोजी झालेल्या जि.प. सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त आपले माहितीकरीता या सोबत पाठविण्यात येत आहे.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

**सचिव,**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.**

**प्रतिलीपी :-**

१] मा.नामदार श्री. -----------------------------------------------------
-------------------------------------------- महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.

२] मा. श्री. -------------------------------------- खासदार / आमदार.
मुक्काम -------------------- पोष्ट -------------- तालुका ---------------- यांना माहितीस्तव सविनय सादर.

३] मा.मुख्य कार्यकारी अधिकारी /मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सादर.

४] मा. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. यवतमाळ यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता.

५] ---------------------------------------- जि. प. यवतमाळ (सर्व खातेप्रमुख) यांना माहिती तथा पुढील योग्य कार्यवाहीस्तव रवाना. कार्यवृत्तातील आपले विभागासी संबंधीत असलेले विषय, चर्चा व सुचना यावर नियमानुसार कार्यवाही करुन कार्यपुर्ती अहवाल मा.अध्यक्ष, व मुख्य कार्यकारीअधिकारी यांचेकडे स्वतंत्ररित्या त्वरीत सादर करण्याची दक्षता घ्यावी.

६] गट विकास अधिकारी, पंचायत समिती ------------------- (सर्व)

*** *** *** ***

## दिनांक १०. ७.०१.२०१४ रोजी झालेल्या जि.प. सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त.

यवतमाळ जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा दि.१०. ०७. २०१४ रोजी दु. १. ०० वाजता मा. श्री. प्रविण विनायकराव देशमुख, अध्यक्ष, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेला खालील जि. प. चे सन्मा. पदाधिकारी, सन्मा. जि.प.सदस्य, मा. सभापती, प.स. व मा. मु.का.अ., खाते प्रमुख व आमंत्रीत अधिकारी उपस्थित होते.

| **मा. पदाधिकारी /अधिकारी सर्वश्री** | | | |
|---|---|---|---|
| श्री. प्रविण वि. देशमुख | अध्यक्ष, जि.प. | श्री. ययाती म. नाईक | उपाध्यक्ष जि.प. |
| श्री. सुभाष म. ठोकळ | सभा. (अर्थ.व बांध.) | श्री. मनमोहनसिंग अ. चव्हाण | सभा (शि.व.आ.) |
| श्री. प्रभाकर रा. ऊईके | सभापती (स.क.स.) | सौ. प्राजक्तताई नि. मानकर | सभा (म.व.बाक) |
| श्री. राहुल मा. ठाकरे | सदस्य | श्री. देवानंद न.पवार | सदस्य |
| श्री. संदिप तु. हिंगमीरे | सदस्य | श्री.अनिल शं.मांगुळकर | सदस्य |
| श्री.नरेंद्र केशवराव ठाकरे | सदस्य | श्री.योगेश शि.देशमुख पारवेकर | सदस्य |
| श्री. प्रकाश दे. कासावार | सदस्य | डॉ.भिमराव नंदाजी राठोड | सदस्य |
| सौ.ज्योती जिवन ठेंगे | सदस्य | सौ.सुलोचना मोहन भोयर | सदस्य |
| सौ. विमलबाई र. चव्हाण | सदस्य | सौ.मंदा ज्ञानेश्वर गाडेकर | सदस्य |
| सौ.शांताबाई रामा राठोड | सदस्य | सौ.लताबाई पांडुरंग खांदवे | सदस्य |
| श्री. शिवशंकर श्रा. पांढरे | सदस्य | सौ. सिमाताई मु. देशभ्रतार | सदस्य |
| श्री. वसंतराव ना. चंद्रे | सदस्य | - | - |
| - | - | श्री.प्रविण बाबाराव उईके | सदस्य |
| श्री.परशराम गंगाराम डवरे | सदस्य | सौ.अर्चना सुरेशराव कोडापे | सदस्य |
| सौ. स्मिता महादजी कदम | सदस्य | सौ.योगीता महेंद्र कोडापे | सदस्य |
| श्री. अनिल भ. नरवाडे | सदस्य | - | - |
| - | - | सौ.निलीमाताई म.गोहणे | सदस्य |
| सौ.आरती हरीभाऊ फुपाटे | सदस्य | श्री.दिवाकर नानाजी ढोले | सदस्य |
| - | - | श्री.मिलिंद प्रभाकर धुर्वे | सदस्य |
| श्री. अरुण देवराव कळंबे | सदस्य | ॲड.सिमा लक्ष्मणराव तेलंगे | सदस्य |
| सौ.वर्षाताई रमेश पाटील | सदस्य | सौ. माधवीताई प्र. पाटील | सदस्य |
| सौ.व्दारकाबाई सा. पारध | सदस्य | सौ. अर्चनाताई वि. राऊत | सदस्य |
| सौ. सुनिताताई ग. किन्नेकार | सदस्य | सौ.संगिता अनील राजूरकर | सदस्य |
| सौ. दिपाली बाबुसिंग जाधव | सदस्य | कु. अलका रमेश टेकाम | सदस्य |
| श्री. दिवाकर धनु राठोड | सदस्य | श्री.शरद उध्दवराव चिकाटे | सदस्य |
| सौ.रुक्मीना विष्णू उकंडे | सदस्य | सौ. उमाताई विजय पिदूरकर | सदस्य |
| सौ.मिनाक्षी विलास राऊत | सदस्य | श्री.आशिष आ. कुळसंगे | सदस्य |
| श्री.सोनबा भिमराव मंगाम | सदस्य | सौ.शिल्पाताई सं. सिर्तावार | सदस्य |
| श्री. अमोल शंकरराव राठोड | सदस्य | श्री.राकेश राघोलू नेमनवार | सदस्य |
| श्री. पंढरी हरीभाऊ सिंहे | सदस्य | सौ.उषाताई रामसिंग राठोड | सदस्य |
| सौ.संगीता दादाराव इंगोले | सदस्य | श्री. प्रविण वसंतराव शिंदे | सदस्य |
| श्री. प्रल्हाद शामराव मांडवकर | सभापती, पं.स. कळंब | श्री. रुपेश सु.रेड्डी कल्यमवार | सभापती, पं.स. घाटंजी |
| श्री. राजू पांडूरंग विरखेडे | सभापती, पं.स. आर्णी | श्री. अशोक तानबाजी केवटे | सभापती,पं.स.राळेगाव |
| सौ. प्रतिभा देवराव कडू | सभापती,पं.स.बाभुळगाव | सौ. शालु रामहरी लोखंडे | सभापती, पं.स. दारव्हा |
| सौ. शालीनी अभय सोमलकर | सभापती, पं.स. वणी | सौ. सपना संजय लंगोटे | सभापती,पं.स.यवत |
| सौ. प्रतिभा राजु आसुटकर | सभापती, पं.स. मारेगाव | - | - |
| सौ. संगीताताई के. नाकले | सभापती, पं.स. झरी जा. | श्रीमती आशाबाई सं.पांडे | सभापती, पं.स. पुसद |
| श्री. रितेश बा. परचाके | सभापती.प.स.पांढरकवडा | श्री. विजय रा. कृष्णापुरे | (प्र.)सभा.पं.स.महागाव |
| | | | |

| इतर आमंत्रीत अधिकारी व कर्मचारी | | | |
|---|---|---|---|
| डॉ.श्री.मल्लीनाथ कलशेट्टी | मुख्य कार्यकारी अधिकारी | डॉ.श्री. शरद कुलकर्णी | अति.मु.का.अ. |
| श्री.विनय ठमके | प्र.सं. जि.ग्रा.वि.य. | श्री.अरुण मोहोड | उप मु.का.अ.(सा.) |
| डॉ. प्रशांत रुमाले | उ मु.का.अ.(पंचा.) | श्री. व्ही.के.मरसाळे | उप मु.का.अ.(बा.क.) |
| श्री. सुरेश शहापुरकर | मु.ले.वि.अ. | श्री. एस.एस.तपासे | का.अ. बांध-१ |
| श्री.ए.एम. नितनवरे | का.अ.बांध. २ | श्री. शि.वा. वद्देवार | का.अ.सिंचन |
| श्री. के.टी. उमाळकर | का.अ.पा.पु | डॉ. के.झेड.राठोड | जि.आ.अ. |
| डॉ. दिलीप सोनकुसरे | जि.प.सं.अ | श्री. जे.आर.राठोड | कृ.वि.अ. |
| श्रीमती सुचिता पाटेकर | शि.अ.निरंतर | श्री.एस.जी.वसावे | शि.अ.(माध्य.) |
| श्री. व्ही.के.मरसाळे | (प्र.) समाज कल्याण अधिकारी | श्री.सुचिता पाटेकर | शि.अ.(प्राथ.) |
| श्री. देवानंद रामटेके | उप शि.अ.(प्राथ.) | श्री.एम.एस. गवळी | क.भू.वै.भू.स.वि.यं.यवतमाळ |
| श्री. अमित मो. आडे | उप का.अ.(पा.पु.) | श्री.चंद्रकांत कारीया | उप का.अ.पं.प्र.ग्रा.स.यो. |
| श्री. जालींदर पठारे | ग.वि.अ.नरेगा | श्री.विजय समदुरकर | का.अ.(प्र.) म.जि.प्रा. ना.व.ग्रा. |
| श्री. संजय वानखेडे | कृ.अ.म.ग्रा.रो.ह.यो | सौ. ज्योती भोंडे | व.ले.अ.जि.प.यवतमाळ |
| श्री.वाल्मीक इंगोले | उप शि.अ.(प्राथ.) | श्री. सुनिल क. राठोड | अ.अ.महावितरण यवतमाळ |
| श्री.व्ही.एम. कटके | स.प्र.अ.पांढरकवडा | श्री. अ.ना. निसाळ | उप.का.अ.सिंचन |
| श्री.अ.वि.सुने | स.प्र.अ.जि.ग्रा.वि.य. | श्री.सतिश सवाई | लेखा अधिकारी जि.प.यवतमाळ |
| श्री.एच.आर. मोदाणी | स.ले.अ.वित्त विभाग | श्री. एम.एम.गवई | स.ले.अ. स.क.विभाग |
| श्री. एन.व्ही. सुने | स.ले.अ.वित्त विभाग | श्री.व्ही.एम.कोंडे | शा.अ.भु.स.वि.यं.यवतमाळ |
| श्री.आर.सु.कठाळे | क.स. शि.अ.(प्राथ.) | श्री. विजय पारवानी | स्वि.सहा. मु.का.अ. |
| श्री.व्ही.एस.जुनघरे | क.अभि.बी.आर.जी.एफ. | श्री.बी.आर.चरडे | स्विसहाउप.मु.का.अ(सा) |
| श्री.पी.के.भोंग | स्विय सहा. मा.अध्यक्ष | श्री. बेजलवार | स्वि.सहासभाअर्थ व बांध. |
| श्री.रमेश टोम्पे | स्विय सहा. मा.अध्यक्ष | श्री.प्रमोद बहाड | स.शि.जिप.उ.प्रा.शा.जोडमोहा |
| श्री. एम.एम. आत्राम | स्वि.सहा. सभा. स.क.स. | श्री.एन.पी.कोडगीरवार | क.प्र.अ.सा.प्र.वि |
| श्री.श्रीकांत मडावी | क.सहा.सा.प्र.वि | श्री. व्ही.पी. चहाकार | आरोग्य विभाग |
| श्री.अ.की.कटाळे | का.अ.म.वि.वि.कं.यवतमाळ | | |

सचिवांनी उपस्थितांचे स्वागत करुन जन-गण-मन या राष्ट्रगीतानंतर विषय पत्रीकेवरील विषयास सुरुवात करण्यापुर्वी नव्याने रुजु झालेल्या अधिका-यांनी स्वतः चा परिचय सभागृहात करुन दयावा असे सांगीतले. त्यानुसार श्री. अरुण मोहोड, यांनी उप मु.का.अ.(सा.) म्हणुन कार्यभार स्विकारल्याबाबत सभागृहास सांगीतले. त्यानंतर सचिवांनी नवनिर्वाचीत सन्मा. जि.प. सदस्य श्री. प्रविण वसंतराव शिंदे यांचे मा. अध्यक्ष जि.प. यवतमाळ यांनी सभागृहाचे वतीने त्यांचे स्वागत रोप देऊन केले. तसेच सभागृहातील जेष्ठ नेते व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष श्री. रामजी आडे यांचे दिनांक ४ जुलै २०१४ रोजी दुःखद निधन झाल्यामुळे दोन मिनिट उभे राहुन सभागृहाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. व त्यानंतर पुढील कामकाजास सुरवात केली.

**प्रश्नोत्तरे :-**

**१. सन्मा. सदस्य श्री.वसंतराव ना. चंद्रे** यांनी लेखी निवेदनाव्दारे जि.प. मध्ये अखर्चीत निधी आहे काय व असल्यास किती ? या बाबतची विचारणा केली होती. त्यावर मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी दिनांक ३० जून २०१४ पर्यंत रु.१९ कोटी शासनाकडे परत करण्यात आले असुन सदरचा परत करण्यात आलेला निधी हा वेतनासाठी आलेला होता असे सांगुन सदर्हु निधी विकास कामासाठी आला नसल्याचे सांगीतले. तसेच निधीचा ताळमेळ झालेला नसुन ताळमेळ घेणेबाबतच्या सुचना सर्व विभागांना देण्यात आलेला असुन विभागांकडील माहिती घेऊन सन्मा. सदस्यांना पुरविण्यात येणार असल्याचे सांगीतले.

**२. सन्मा. सदस्य श्री .वसंतराव ना. चंद्रे** यांनी ढाणकी ता. उमरखेड येथे ग्रा.प.ने अवैध ग्रामसभा दाखवुन ढाणकी येथे देशी दारुचे दुकान सुरु करण्यासाठी ग्रा.प. चे नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे. तरी सदर्हु दुकान बंद करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच श्री. चोपडे, ग्रा. वि. अ. यांनी चुकीची माहीती दिली असल्याने त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी अशी विचारणा केली होती. त्यावर **मा.मुख्य कार्यकारी अधिकारी** यांनी १५ दिवसात चौकशी करुन सबंधिताविरुध्द कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश उप मु.का.अ.( पंचा.) यांना दिले.

**३. सन्मा. सदस्य श्री .वसंतराव ना. चंद्रे** यांनी म.ग्रा.रो.ह.यो. योजनेअंतर्गत विहीर खोदकाम व बांधकाम पुर्ण झालेल्या कुशल कामगारांना निधी देणार काय व कधी देणार तसेच नविन विहीरींना प्रशासकीय मान्यता कधी मिळणार याबाबत विचारणा केली. त्यावर गट विकास अधिकारी म.ग्रा.रो.ह.यो. यांनी उक्त प्रकरणी विचारणा केल्यानुसार सन्मा. सदस्यांना सविस्तर माहिती लेखी स्वरुपात पुरविण्यात येईल असे सांगीतले.

**४. सन्मा. सदस्य श्री .वसंतराव ना. चंद्रे** यांनी नविन सिंचन विहीरींना मान्यता कधी दिली जाणार याची विचारणा केली असता कार्य.अभि.सिंचन यांनी याबाबत सन्मा.सदस्यांना लेखी कळविण्यात येईल असे सांगितले.

**५ सन्मा. सदस्य श्री अनिल भ. नरवाडे** यांनी विहीरीचे प्रस्ताव पंचायत समितीला नामंजुर झाले असल्याचे सांगून सदरचे प्रस्ताव कोणी रद्द केले आहेत व त्यावर पर्यायी व्यवस्था काय ? याची माहिती देण्यात यावी असे सांगीतले.

**६ सन्मा. सदस्य सौ.आरतीताई ह. फुफाटे** यांनी सन २०१० पासून १०७७ विहीरी पुसद तालुक्यात देण्यात आल्या असल्याचे सांगून त्या पैकी कांही विहिरी निधीअभावी अर्धवट, तर कांही विहिरी पूर्ण करण्याबाबत ग्रामसेवकांची इच्छा नाही तरी याबाबत निर्णय काय घेणार ? असी विचारणा केली .सदर विषयावर चर्चा होऊन मा.अध्यक्ष, जि.प.यवतमाळ यांनी टप्प्या टप्प्याने तालुकानिहाय सभा घेऊन हा विषय निकाली काढू व पहिल्या टप्प्यात पंचायत समिती पुसद महागाव घेऊ असे सांगितले.

**मा.उपाध्यक्ष**, जि.प.यवतमाळ यांनी पुसद पंचायत समिती मध्ये सिंचन विहीरीसाठी अर्ज दिल्यानंतर शेतक-यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. परंतू पात्र अपात्रची यादी देण्यात आलेली नसून मागील दोन वर्षापासून मिळाली नसल्याचे सांगितले. त्यावर **सन्मा. सदस्य श्री देवानंद न. पवार** यांनी जि.प.चे उपाध्यक्षांना दोन वर्षापासून माहिती मिळालेली नाही ही बाब चिंताजनक असून यावरुन सामान्य जनतेची काय परिस्थीती असेल याचा अंदाज आपण घेऊ शकतो असे सांगून याबाबत प्रशासनाने गांभीर्य लक्षात घ्यावे असे सांगितले. सदर विषयावर चर्चा होवून **मा.अध्यक्ष** यांनी परिस्थिती सर्वांनाच माहित आहे व अडचणी सर्वच ठिकाणी असल्याचे सांगून मा.उपाध्यक्षांनी सकारात्मक दृष्टीकोणातून पुसदचे उदाहरण देवून प्रशासनाची अडचण समोर मांडली आहे. तसेच आमच्याकडून प्रशासना मध्ये सुधारणा करण्याचे प्रयत्न सुरुच असल्याचे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. मिलींद प्र. धुर्वे** यांनी लेखी निवेदनाव्दारे दलित वस्तीच्या विकासाकरिता रु.१७.०० कोटी चा निधी कोणत्या वर्षाच आहे व तो जिल्हा परिषदेला कधी प्राप्त झाला तसेच सदर निधी चे नियोजन कधी करण्यात आले आहे व त्यास जि.प. च्या मान्यतेची गरज नाही काय ? तसेच प्रशासकीय मान्यतेचा आदेश कधी काढण्यात आला याची विचारणा केली. त्याचप्रमाणे सन २०१३-१४ मध्ये कोणत्या वैयक्तीक लाभाच्या योजना घेण्यात आल्या ? व आदेश दिल्या पैकी कोणते साहीत्य अदयापर्यंत विभागास प्राप्त झाले नाही याची माहीती पुरविण्यात यावी. व साहीत्य उपलब्ध करुन न देणा-या पुरवठाधारकावर कोणती कार्यवाही करण्यात आली याची विचारणा केली. त्यावर **मा.अतिरिक्त मु.का.अ.** यांनी समाज कल्याण विभागा संबंधित योजनांचा निधी सर्व पंचायत समितीकडे पाठविण्यात आला असल्याचे सांगुन अखर्चीत निधी मोठया प्रमाणात आहे असे सांगीतले. तसेच अखर्चीत निधीची माहिती देतांना त्यावर समाज कल्याण अधिकारी यांनी स्वाक्षरी करण्यास नकार दिला यावरुन सबंधित विभागप्रमुखाचा माहिती लपविण्याचा प्रकार आहे असे दिसून येत असल्याचे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. अध्यक्ष** यांनी समाज कल्याण अधिकारी यांच्याकडून वेळेवर कार्यवही होत नाही. प्रत्येक वेळेस त्यांची तक्रार येते. समाज कल्याण अधिकारी अकार्यक्षम आहेत अशी सर्व सदस्यांची भावना आहे. ही भावना लक्षात घेता त्याना सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय यवतमाळ या पदावर रुजु करुन घेण्यात येऊ नये त्याचप्रमाणे त्यांच्या विरोधात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सर्व तक्रारींची दखल घेऊन जि. प. स्तरावरील अधिकारानुसार त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य सौ. वर्षाताई र. पाटील** यांनी ता. पुसद मधील पोखरी-इजारा येथिल हायस्कूल वरील शिक्षण हे मागिल १३ वर्षापासून गैरहजर असुन सदर्हु प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने रिक्त पद भरण्यात यावे असे सांगीतले.

**सन्मा जि.प. सदस्य श्री. देवानंद न.पवार** यांनी मागील दोन महिण्यापासुन पावसाच्या लहरीपणामुळे शेतक-यांना दुबार, तिबार पेरणी करावी लागल्याने निर्माण झालेल्या दुष्काळ सदृष्य परिस्थितीमुळे हवादिल झालेल्या शेतक-यांना आर्थिक परिस्थीतीशी सामोरे जावे लागणार आहे. तरी अश्या शेतक-यांना संकटातुन बाहेर काढण्यासाठी शासनामार्फत मोफत बि-बियाणे , रासायनीक खते व गुरांकरिता छावणी आणी पीण्याच्या पाण्याची पातळी दिवसेनदिवस खोलवर जात असल्यामुळे उद्‌भवणा-या पाणी टंचाई परिस्थीतीचे सर्वेक्षण शासन यंत्रणेमार्फत तात्काळ करण्यात यावे व राज्य शासन /केंन्द्र शासनाकडुन आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी. शेतकरी पुन्हा स्वतः ला स्थापीत करुन घेण्यासाठी त्याला आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. तरी शेतक-यांना बी-बीयाने व खते मोफत उपलब्ध करुन द्यावेत. तसेच गुरांच्या करिता छावणी उभारण्यात याव्यात व गुरांना वेळेवर चारा उपलब्ध होण्यासाठी चारा डेपोची व्यवस्था करण्यात यावी. व शेतक-यांना तात्काळ आर्थीक मदत जाहीर करावी अशी मागणी करणारा ठराव आजचे सभेमध्ये मंजुर करुन केंन्द्र शासनाकडे व राज्य शासनाकडे सादर करण्यात यावा असे सांगीतले.

**सन्मा जि.प. सदस्य श्री. आशिष आ. कुळसंगे** यांनी आताच्या परिस्थीतीचे सर्वेक्षण होऊन संपुर्ण जिल्हा दुष्काळग्रस्त घोषीत करावा व काहीतरी आर्थीक फायदा शेतक-यांना मिळाला पाहीजे. त्याकरीता जे कांही कर्ज शेतक-यांनी घेतले आहे ते कर्ज माफ होण्याकरिता शासनास प्रस्ताव सादर करणत यावा असे सांगीतले.

**मा. सभापती प.स.राळेगाव** यांनी सन २०१२-१३ मध्ये शासनाने शेतक-यांना प्रोत्साहीत केल्यानुसार ज्या शेतक-यांनी पीक विमा काढलेला आहे व सद्यस्थितीत शेतक-यांचे अतिशय नुकसान झाले आहे. परंतु शासनाने आजही शेतक-यांना पीक विमा योजनेचा लाभ दिलेला नाही. तरी विम्याचे वाटप त्वरीत होण्याबाबत शासनास कळविण्यात यावे असे सांगीतले.

**यावर मा. अध्यक्ष** यांनी अतिशय विदारक परिस्थीती महाराष्ट्रात यवतमाळ जिल्हामध्ये निर्माण झाली आहे. पावसाच्या लहरीपणामुळे शेतक-यांना दुबार, तिबार पेरणी करावी लागली. त्यामुळे शेतक-यांना आर्थिक परिस्थीतीशी सामोरे जावे लागणार आहे. तरी अश्या शेतक-यांना संकटातुन बाहेर काढण्यासाठी शासनामार्फत मोफत बि- बियाणे , रासायनीक खते व गुरांकरिता छावणी आणी पीण्याच्या पाण्याची पातळी दिवसेनदिवस खोलवर जात आहे. तरी अश्या परिस्थीतीचे सर्वेक्षण शासन यंत्रणेमार्फत तात्काळ करण्यात यावे. तसेच शेतक-यांची बि- बियाणे विकत घेण्याची क्षमता काहीही राहीलेली नाही त्यामुळे शेतक-यांना मोफत बियाणे उपलब्ध झाले पाहीजे. तसेच मोफत रासायनीक खत शासनाकडुन उपलब्ध करुन दिले गेले पाहीजे. एवढेच नाही तर शेतीची पेरणी करण्याकरिता बॅकेमार्फत ज्या कर्जाचा पुरवठा करण्यात आला होता त्याचा शेतक-यांना काहीही उपयोग झाला नसल्याने पुनश्चः कर्जाचा पुरवठा होण्याकरीता शासनाने बॅकेला निधी उपलब्ध करुन दिला पाहीजे असे सांगुन शेतकरी हा अल्पभूधारक आहे किंवा मोठा शेतकरी आहे हे न पाहता सरसकट सर्व शेतक-यांना आर्थीक परिस्थीतीच्या संकटातुन बाहेर निघण्याकरिता शासनाकडुन लाभ मिळालाच पाहीजे असे सांगुन याबाबत राज्य शासन /केंन्द्र शासनाकडुन आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी यासाठी आजच्या सभेत ठराव घेऊन केंन्द्र शासनाकडे /राज्य शासनाकडे सादर करण्यात येत असल्याचे सांगीतले. **सदर विषयावर चर्चा होऊन मा. अध्यक्ष** यांनी खालीलप्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र १:-** **पावसाच्या लहरीपणाने जिल्हयातील शेतक-यांवर दुबार, तिबार पेरणीचे संकट कोसळले आहे. दुष्काळ सदृष्य परिस्थितीमुळे हवालदिल झालेल्या शेतक-यांना बिकट परिस्थीतीला सामोरे जावे लागणार आहे. तरी अश्या शेतक-यांना संकटातुन बाहेर काढण्यासाठी शासनामार्फत मोफत बि- बियाणे , रासायनीक खते व गुरांकरिता चारा छावणीची व्यवस्था**

**करण्यात यावी. शेतीच्या पेरण्या वाया गेल्यामुळे पिक कर्जाचे पैसे वाया गेले आहेत.शेतक-यांना तातडीने वाढीव पिक कर्ज उपलब्ध करुन द्यावे. त्यासाठी शासनाने बॅंकेला निधी उपलब्ध करुन दिला पाहीजे. अशी मदत देताना जमिनधारणेची अट टाकू नये. सरसकट सर्व शेतक-यांना या संकटातुन बाहेर निघण्याकरिता शासनाकडुन लाभ मिळाला पाहीजे. तरी केन्द्र शासनाने व राज्य शासनाने शेतक-यांना तात्काळ आर्थीक मदत जाहीर करावी. पिण्याच्या पाण्याची पातळी दिवसेंदिवस खोलवर जात असल्यामुळे उद्भवणा-या पाणी टंचाई बाबत शासन यंत्रणेमार्फत तात्काळ सर्वेक्षण करण्यात यावे. अशी ही सभा ठरावाव्दारे केंन्द्र व राज्य शासनास विनंती करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**ठरावाचे अनुषंगाने पुढील कार्यवाही कृषि विकास अधिकारी यांनी करण्याबाबत ही सभा निर्देश देते.**

**विषय क्र. २ :- दिनांक ०६.०५.२०१४ रोजी झालेल्या जि.प.सर्वसाधारण सभेच्या अहवालास मंजुरी देणे.**

**सन्मा. सदस्य श्री.वसंतराव ना. चंद्रे** यांनी मागील सभेत बी.ओ.टी. तत्वावरील कामांबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर का.अ. बांध. क्र.१ यांनी सल्लागार श्री. पाटील यांचे कडून कामकाजास सुरुवात करण्यात आले असल्याचे सांगीतले.

**मा.सभापती, प.स. बाभुळगाव यांनी सौ.प्रतिभा देवराव कडू** यांनी ता.बाभुळगाव-घारफळ येथील पशुदवाखान्याचे काम सुरु करण्यात यावे असे सांगीतले. त्यावर का.अ.बांध.क्र. १ यांनी उक्त प्रकरणी माहिती घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री.देवानंद न. पवार** यांनी मागील सभेत प्रभाग समितीकरिता गट विकास अधिकारी यांचेकडुन सहकार्य मिळत नसल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. तसेच प्रभाग समिती घेण्याबाबत सचिवांनी अद्याप कळविले नसल्याचे सांगुन आजपर्यंत प्रभाग समितीची सभा झाली नसल्याचे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. अध्यक्ष** यांनी यापुढे प्रभाग समितीबाबत सचिवांनी दुर्लक्ष केल्यास त्यांचे विरुध्द मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावरुन नियमानुसार कार्यवाही करावी असे सांगीतले.

**ठराव क्र.२ :- दि.०६.०५.२०१४ रोजी झालेल्या जि.प.सर्वसाधारण सभेच्या अहवालास ही सभा मंजुरी प्रदान करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय ३ :- शासन आदेश व परिपत्रकाचे वाचन करणे.**

जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी ग्रामसभेमध्ये आरोग्यविषयक जनजागृती होण्यासाठी आरोग्याबाबतचे विषय घेण्याबाबत उपसचिव म.शा. यांचेकडील ग्रा.वि. व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.व्हीपीएम-२०१४/प्र.क्र.८०/पंरा-३/दिनांक २६ जुन २०१४ चे वाचन केले.

**विषय क्र. ४:- जि. प. चे सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक अवलोकनार्थ ठेवणेबाबत.**

मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी माहिती सभेत दिली. सार्वत्रीक लोकसभा निवडणूक २०१४ बाबतची आदर्श आचार संहिता दि.५ मार्च २०१४ पासुन लागु करण्यात आलेली होती. त्यासंबंधी मा.सहाय्यक संचालक,म.शा. यांचे पत्र क्र.संकिर्ण -२०१४/प्र.क्र.५/वित्त-६ दि. ७ मार्च २०१४. अन्वये निवडणूक आचार संहिता लागू होण्यापूर्वी ज्या जिल्हा परिषदांनी त्यांचा सन २०१३-२०१४ चा सुधारित व सन २०१४-२०१५ चा मुळ अर्थसंकल्प जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेकडून मंजूर करुन घेतला नाही , त्या जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना

राजपत्रातील तरतूदीनूसार सदरील अर्थसंकल्प मंजूर करावा व अर्थसंकल्पविषयक बाबींसंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लोकसभेची आचार संहिता संपल्यानंतर जिल्हा परिषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत ठेवावा. असे कळविण्यात आलेले आहेत.

लोकसभा आचार संहितेमुळे दि. २७.३.२०१४ पावेतो अर्थसंकल्पीय सभा घेणे शक्य होणार नाही. यास्तव जिल्हा परिषदेचे चे सन २०१३-२०१४ चे सुधारीत व सन २०१४-२०१५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज मंजुर करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद यांना देण्यात आलेले आहेत. तथापी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी ,जि.प. यांनी सन २०१४-२०१५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज जिल्हा परिषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत अवलोकनार्थ व योग्य कार्यवाहीस्तव ठेवावेत.अशा सुचना संदर्भीय क्र २ अन्वये शासनाकडुन प्राप्त आहेत.

ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शा.नि. दि.२० आक्टोंबर १९९९ नुसार समाज कल्याण विभागाकरीता जि.प. स्वउत्पन्नामधुन अंदाजपत्रकामध्ये करावयाची २०% तरतुद ,आयुक्त अपंग कल्याण म.रा. पुणे यांचे दि १४/८/२००३ चे पत्रान्वये अपंगाकरीता ३% तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शा.नि.दि. ६ नोव्हेबर २००१ नुसार महिला व बाल कल्याण समिती करीता जि.प. स्वउत्पन्नामधुन अंदाजपत्रकामध्ये करावयाची १०% तरतुद तसेच पाणी पुरवठा विभागाकरीता करावयाची तरतुद २०% आहे.त्यानुसार तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा परिषदेला सन २०१३-२०१४ करीता प्राप्त स्वउत्पन्न व सन २०१४-२०१५ चे अपेक्षीत प्राप्त उत्पन्नाचे अनुषंगाने वरिल प्रमाणे संबंधीत विभागाकरीता जि.प.चे अंदाजपत्रकामध्ये तरतुदी उपलब्ध करुन देण्याबाबतची शक्यतो कार्यवाही करण्यात आलेली आहे.

उक्त संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सन २०१३-२०१४ चे सुधारीत व सन २०१४-२०१५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज मंजुर करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद यांना देण्यात आलेले असल्याने जिल्हा परिषदेच सन २०१३-२०१४ चे सुधारीत व सन २०१४-२०१५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्याअन्वये खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ ची जमेची बाजु खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे.

| **लेखा शिर्ष** | **सन २०१३-२०१४ चे मुळ अंदाजपत्रक** | **सन २०१३-२०१४ चे सुधारीत अंदाजपत्रक** | **सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रक** |
|---|---|---|---|
| महसुली जमा | २१३९१८००० | ३२९२७४३०८ | २१४७७८००० |
| भांडवली जमा | ९७००५६२४ | १०६१८९०१७ | ११३०४२००० |
| वित्त प्रेषण जमा | ५०००००००० | ६०००००००० | ६०००००००० |
| सुरवातीची शिल्लक | ८९३८९७०६ | ८९३८९७०६ | १२३५६०३१४ |
| वजा परतावे (-) | ५०००००० | १२००००००० | १२००००००० |
| **एकूण जमा** | **५३५०३१३३३०** | **६४०४८५३०३१** | **६३३१३८०३१४** |

सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ चा जमेचा गोषवारा खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेला आहे.

| प्रधान लेखा शिर्ष | सन २०१३-२०१४ चे मुळ अंदाजपत्रक | सन २०१३-२०१४ चे सुधारित अंदाजपत्रक | सन २०१४-२०१५ चे मुळ अंदाजपत्रक |
|---|---|---|---|
| १. कर व फी | १९००००० | ३२९६०८ | १९००००० |
| २. स्थानिक उपकर | २२५३०००० | ६६२४६२७१ | २००२०००० |
| ३. स्थानिक कर | - | - | - |
| ४. शासकिय अनुदाने | १९५००००० | ७८०२८६०० | १५०००००० |
| ५. व्याज | ३०९००००० | ३०९००००० | ४१५००००० |
| ७. शिक्षण | २२५००० | ३२५५९७ | १५०००० |
| ८. शिक्षण मानधन व वेतन | १२७३८५००० | १४६११६००० | १२७३८५००० |
| ९. सार्वजनिक आरोग्य | १५००००० | ० | ० |
| १०. कृषी | ३१३००० | ४२४६०० | ५००००० |
| ११. पशुसंवर्धन | ३२००००० | १९६६४१० | २७००००० |
| १३. सार्वजनिक बांधकामे | १४१५००० | १०३६२०० | १६२३००० |
| १४. निवृत्ती वेतने | १०००००० | ८००००० | १०००००० |
| १५. संकीर्ण जमा | ४०५०००० | ३०२१०२२ | ३०००००० |
| **एकूण महसुली जमा** | **२१३९१८०००** | **३२९२७४३०८** | **२१४७७८०००** |

सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ ची खर्चाची बाजु खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे.

| लेखा शिर्ष | सन २०१३-२०१४ चे मुळ अंदाजपत्रक | सन २०१३-२०१४ चे सुधारीत अंदाजपत्रक | सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रक |
|---|---|---|---|
| महसुली खर्च | २९१५८९००० | २९५१०३७०० | ३३८२५०००० |
| भांडवली खर्च | ९७००५६२४ | १०६१८९०१७ | ११३०४२००० |
| वित्त प्रेषण | ५००००००००० | ६००००००००० | ६००००००००० |
| अखेरची शिल्लक | ११७१८७०६ | १२३५६०३१४ | ८८३१४ |
| वजा परतावे (-) | ५००००००० | १२००००००० | १२००००००० |
| **एकूण खर्च** | **५३५०३१३३३०** | **६४०४८५३०३१** | **६३३१३८०३१४** |

सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ चा खर्चाचा गोषवारा खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेला आहे.

| प्रधान लेखा शिर्ष | सन २०१३-२०१४ चे मुळ अंदाजपत्रक | सन २०१३-२०१४ चे सुधारित अंदाजपत्रक | सन २०१४-२०१५ चे मुळ अंदाजपत्रक |
|---|---|---|---|
| १. अध्यक्ष | ९१३१००० | ८२५७००० | १४२२३००० |
| २. सामान्य प्रशासन | ८९६०००० | ८७२५००० | १०१८०००० |
| ३. शिक्षण | २१५२००० | १३००००० | ४६५१००० |
| शिक्षण मानधन व वेतन | १२७३८५००० | १२७३८५००० | १२७३८५००० |
| ४. बांधकामे क्र. १ | १५३४३००० | १४६४७००० | १६८६६००० |
| क्र. २ | १३५३००० | १३२०००० | ३२८३००० |
| ५. सिंचन | १५५१००० | २३४०००० | २२४०००० |
| ८. सार्वजनिहक आरोग्य | १६५०००० | १६५०००० | १९००००० |
| ९. सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी | ३०००००० | ४६००००० | ५०००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. व्याज | ० | ० | ० |
| ११. कृषी | ११८११००० | १३०५१७०० | २९६५३००० |
| १२. पशुसंवर्धन | ३८०४००० | ३८००००० | ५३०२००० |
| १३. वने | २८३१०००० | ३३४१०००० | २१५०४००० |
| १४. समाजकल्याण | २१०१४००० | २३६१३००० | ३१०००००० |
| १४. अपंगकल्याण | १६००००० | १६००००० | ३६००००० |
| १४. बालकल्याण | ९८२०००० | १०३४४००० | ११९००००० |
| १७. सामुहिक विकास | ६२००००० | ६२००००० | ६२००००० |
| १९. निवृती वेतन | १०००००० | १६००००० | १०००००० |
| २०. संकिर्ण | ३७५०५००० | ३१२६०९०२ | ४२३६३००० |
| **एकूण महसुली खर्च** | **२९१५८९०००** | **२९५१०३६०२** | **३३८२५००००** |

वरिलप्रमाणे जिल्हा परिषदेचे जमा-खर्च गोषवारा निहाय सन २०१३-२०१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक शासनाने प्रदान केलेल्या अधिकारान्वये तयार करण्यात आलेले अंदाजपत्रकास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंजुरी प्रदान केलेली आहे.

तसेच पशुसंवर्धन विभागास सन २०१३-२०१४ अंतर्गत शेळी प्रजनाना साठी उत्तम प्रतीचा बोकड पुरविणे योजना अंतर्गत अखर्चीत रक्कम रु.१६.०० लक्ष तसेच २- सामान्य प्रशासन अतर्गत सन्मा. जि.प.सदस्यांचे प्रवास भत्ता अंतर्गत करण्यात आलेल्या मंजुर तरतुदी पेक्षा रु.९.५० लक्ष जादा खर्चास व सन २०१३-२०१४ मधील भजनी साहित्य पुरविणे १०% अदायगी रक्कम अंतर्गत अखर्चीत रु.२.०० लक्ष मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छपरे बदलवुन ९०% अनुदानावर टिनपत्रे पुरविणे योजनेतील उवरीत १०% अदायगी अखर्चीत रक्कम रु.२.५० लक्ष तसेच खालील प्रमाणे समाज कल्याण अंतर्गत १३ वने ,१४- समाज कल्याण व अपंग असे समाजकल्याण अंतर्गत एकुण रु. २,९७,९०,०००/-चा अखर्चीत निधी सन २०१४-२०१५ चे अंदाजपत्रकात सुधारणा करुन खर्च करण्यास जि.प. सर्वसाधारण सभेने मंजुरी प्रदान करावे असे प्रस्तावित आहे.

| अ.क्र | तपशिल | सन २०१३-२०१४ ची मुळ तरतूद | सन २०१४-२०१५ मध्ये मुळ अंदाजपत्रकात केलेली तरतुद | सन २०१४-२०१५ च्या मुळ तरतूदीमध्ये करावयाची सुधारणा |
|---|---|---|---|---|
| १ | **३-शिक्षण** | | | |
| | ७.मान्सुनपुर्व शाळा इमारत दुरुस्तीसाठी जि.प.चा वाटा | ० | ० | ९०००/- |
| | ८.जि.प माध्यमिक शाळांना डेक्स बेंच पुरविणे | ० | ० | १०००/- |
| | ९.विज्ञान प्रदर्शनी | ० | १००००० | ९००००/- |
| | **एकुण** | | **१०००००/-** | **१०००००/-** |
| २ | **४- बांधकामे** | | | |
| | १.जिल्हा परिषद इमारतीची दुरुस्ती व परिरक्षण | - | ३००००००/- | २५०००००/- |
| | १२. पं.स.सभापती निवासस्थान बांधकामे / दुरुस्ती | - | ३०००००/- | ५०००००/- |
| | १५. जि प सदस्यांना पं स मध्ये बसणेसाठी स्वतंत्र दालन | - | २०००००/- | ५०००००/- |
| | १६. ज प महिला सदस्यासकरिता स्वतंत्र दालनाचे व्यवस्थापन | - | ५०००/- | २५०००/- |
| | १७. जि.प.पुरुष सदस्याकरीता स्वतंत्र दालनाचे व्यवस्थापन | - | ५००००/- | ३००००/- |
| | २३. कळंब व वडकी विश्रामगृहाचे बांधकाम - कळंब | - | १५०००००/- | ५०००००/- |
| | ३५. प्रशासकिय इमारतीची रंगरगोटी (स्वर्ण महोत्सवी निमित्य) | - | ० | १०००००/- |
| | ३८. प्रशासकिय इमारतीचे प्रवेद्वार बांधकाम व उद्यान परिसर | - | २००००००/- | १९०००००/- |
| | सौदर्यीकरण करणे | - | | १००००००/- |
| | ३९. जि.प.अध्यक्ष यांचे कक्ष | | - | |
| | **एकुण** | | **७०५५०००/-** | **७०५५०००/-** |

| अ.क्र | तपशिल | सन २०१३-२०१४ ची मुळ तरतूद अखर्चीत | सन २०१४-२०१५ मध्ये मुळ अंदाजपत्रका मध्ये केलेली तरतुद | सन २०१४-२०१५ च्या मुळ तरतूदीमध्ये करावयाची सुधारणा |
|---|---|---|---|---|
| ३ | **८-सार्वजनिक आरोग्य** | | | |
| | २. दुर्धर रोगग्रस्त रुग्णांना आर्थिक सहाय्य | - | ५०००००/- | ७०००००/- |
| | ६.लेक वाचवा अभियान राबविणे. | - | ५०००००/- | ३०००००/- |
| | **एकुण** | | **१००००००/-** | **१००००००/-** |
| ४ | **११ - कृषी** | | | |
| | ३. ७ हेक्टर पावेतो जमीन धारण करणा-या शेतक-यांना ७५ %अनुदानावर पीव्हीसी पाईप पुरविणे. | - | ० | ३१५००००/- |
| | ९. ७ हेक्टर पावेतो जमीन धारण करणा-या शेतक-यांना ७० % अनुदानावर फवारणी पावर स्प्रे पंप पुरविणे. | - | २५०००००/- | १५०००००/- |
| | १५.७ हेक्टर पावेतो जमीन धारण करणा-या शेतक-यांना ७० % अनुदानावर स्पॉयरल सेपरेटर पुरविणे | - | ३५०००००/- | ३००००००/- |
| | १६.७ हेक्टर पावेतो जमीन धारण करणा-या शेतक-यांना ७० % अनुदानावर नॅपसॅक स्पेपंप (आऊटसाईड चेंबर ) पुरविणे | - | २६५००००/- | २००००००/- |
| | १९.७ हेक्टर पावेतो जमीन धारण करणा-या शेतक-यांना ७० % अनुदानावर बॅटरी ऑपरेटेट स्प्रे पंप पुरविणे. | - | ३५०००००/- | २५०००००/- |
| | **एकुण** | | **१२१५०००००/-** | **१२१५०००००/-** |
| ५ | **१२ - पशुसंवर्धन** | | | |
| | ४. झरी जामणी तालुक्यातील आर्थिकदृष्ठ्या कमकुवत महिलांना शेळीचे गट पुरविणे. | - | - | २०००००/- |
| | ८. शेळी प्रजननासाठी उत्तम प्रतीचा बोकड वाटप करणे | १६०००००/- | १६०००००/- | १६०००००/- |
| | १०. तालुकास्तरावर पशु वंधत्व निवारण तथा पशुसंगोपन अभियान राबविणे | - | १००००००/- | ८०००००/- |
| | **एकुण** | **१६०००००/-** | **२६०००००/-** | **२६०००००/-** |
| ६ | **१३-वने** | | | |
| | १.सयुंक्त वन व्यवस्थापन कार्यक्रम अंतर्गत विकास कामाची अमलबजावणी करणे व जीवनोपयोगी साहित्य पुरविणे. | २५०००००/- | ३००००००/-(अ.क्र. १३ वर २५.०० लक्ष वळती) | ५०००००/- |
| | २.जि.प. क्षेत्रात लोकोपयोगी कामे व योजना. | - | १०००/- | १०००/- |
| | ३.जंगल भागातील शेतक-यांना स्प्रे पंप पुरविणे . | - | १०००/- | १०००/- |
| | ४. जंगल भागातील शेतक-यांना ९०% अनुदानावर ताडपत्री पुरविणे. | - | ४००००००/- | ४००००००/- |
| | ५. जंगल भागातील शेतक-यांना ९०% अनुदानावर एच.डी.पी. पाईप पुरविणे. | २५०००००/- | २५०००००/- | २५०००००/- |
| | ६. जगंल भागातील अल्पभुधारक शेतक-यांना ९०% अनुदानावर पि.व्ही.सी पाईप पुरविणे | - | २५०००००/- | २५०००००/- |
| | ७. जगंल भागातील अल्पभुधारक शेतक-यांना ९०% अनुदानावर एच.डी.पी. पाईप पुरविणे. | - | १००००००/- (अ.क्र. १६ वर वळती) | १०००/- |
| | ८. जगंल भागातील अल्पभुधारक शेतक-यांना ९०% सुटीवर सौरकंदील पुरविणे. | - | १०००/- | १०००/- |
| | ९. जगंल भागातील खेडेगांवांना ९०% सुटीवर सौरपथदिवे पुरविणे. | - | १०००/-(अ.क्र. १६ वर वळती) | - |
| | १०. जगंल भागातील अल्पभुधारक शेतक-यांना ९०% अनुदानावर ऑईल इंजिन पुरविणे. | ३२९००००/- | ३५०००००/- (अ.क्र. ५ वर १०.०० लक्ष वळती | २५०००००/- |
| | ११.जगंल भागातील मागासवर्गीय शेतक-यांना७०% अनुदानावर पावर स्प्रे पंप पुरविणे. | २५०००००/- | २५०००००/-(अ.क्र. १६ वर १०.०० लक्ष वळती | - |
| | १२. जगंल भागातील शेतक-यांना ९०% अुदानावर पेरणी यंत्र पुरविणे | ४३०००००/- | २५०००००/-(अ.क्र. १४ वर २३.०० लक्ष वळती | २०००००/- |
| | १३. जगंल भागातील शेतक-यांना ९०% अुदानावर गॅस कनेक्शन पुरविणे. | ० | ० | २५०००००/- |
| | १४. जगंल भागातील शेतक-यांना ९०% अुदानावर स्पायरल सेप्लेटर पुरविणे. | ० | ० | २३०००००/- |
| | १५. जगंल भागातील शेतक-यांना७०% अनुदानावर पावर स्प्रे पंप पुरविणे. | ० | ० | २५०००००/- |
| | १६. जगंल भागातील अल्पभुधारक शेतक-यांना ९०% अनुदानावर सोलर इमरजंसी लाईट (Dusolaxima Maxima) पुरविणे | ० | ० | २००००००/- |
| | **एकुण** | १,५०,९०,०००/- | २,१५,०४,०००/- | २,१५,०४,०००/- |

| अ.क्र | तपशिल | सन २०१३-२०१४ ची मुळ तरतूद अखर्चीत | सन २०१४-२०१५ मध्ये मुळ अंदाजपत्रकात केलेली तरतुद | सन २०१४-२०१५ च्या मुळ तरतूदीमध्ये करावयाची सुधारणा |
|---|---|---|---|---|
| ७ | १४-समाजकल्याण (अ) | | | |
| | १.स्वयंरोजगारासाठी मागासवर्गीय महिलांना ९०% अनुदानावर शिलाई मशिन पुरविणे. | २६०००००/- | २५०००००/- | २५०००००/- |
| | २. मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छपरे बदलून ९०%अनुदानावर टिनपत्रे पुरविणे. | ३५०००००/- | २५०००००/- | २५०००००/- |
| | ४.मागासवर्गीय भजनी मंडळांना भजनी साहित्य पुरविणे. | २००००००/- | ० | ३००००००/- |
| | ५.माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विदयार्थांना सायकल पुरविणे. | - | - | १५०००००/- |
| | ६.मागासवर्गीय शेतक-यांना आईल इंजिन पुरविणे. | २५०००००/- | ४००००००/-(अ.क्र. ४ वर २५.०० लक्ष वळती) | १५०००००/- |
| | ११.मागासवर्गीय उमेदवारांना धान्य साठविण्यासाठी कोठया पुरविणे. | २५०००००/- | २५०००००/-(अ.क्र. ५ वर १५.०० लक्ष व अ.क्र.४ वर ५.०० लक्ष वळती | ५०००००/- |
| | १२. मागासवर्गीय शेतक-यांना पेरणी यंत्र पुरविणे. | १००००००/- | १५०००००/- | १५०००००/- |
| | एकुण | १४१०००००/- | १३००००००/- | १३००००००/- |
| ८ | १४-समाजकल्याण (ब) | - | - | १४०००००/- |
| | २.अपंगांना तिन चाकी सायकल पुरविणे | ६०००००/- | २००००००/-(अ.क्र. २ वर १४.०० लक्ष वळती | ६०००००/- |
| | ४.अपंग कर्मचा-यांना व अपंग लाभार्थीना अपंग विषयक साहित्य पुरविणे. | | | |
| | एकूण- | ६०००००/- | २००००००/- | २००००००/- |
| | १४-(क) **महिला व बाल कल्याण** | | | |
| | १.अंगणवार्डीना साहित्य पुरविणे | - | २५०००००/-(अ.क्र. ४ वर १४.०० लक्ष व अ.क्र.१३वर १.०० लक्ष वळती | १००००००/- |
| | ३.५ वी ते १२ वी मध्ये शिकणा-या मुलींना लेडीज सायकल पुरविणे. | - | ८०००००/- | १५०००००/- |
| | ४.शिलाई मशिन पुरविणे | - | १००००००/- | २४०००००/- |
| | ८.मुलींना व महिलांना जिवन कौशल्याचे (Gender) प्रशिक्षण | - | १५०००००/-(अ.क्र. ३ वर ५.०० लक्ष वळती | १००००००/- |
| | १०.अंगणवाडी मधील गरोदर स्तनदा मातांना अतिरिक्त आहार. | - | २००००००/-(अ.क्र. ३ वर २.०० लक्ष व अ.क्र.१३वर ३.०० लक्ष वळती | १५०००००/- |
| | १३.पंचायत महिला शक्ती अभियान ,महिला मेळावे राबविणे. | - | २०००००/- | ६०००००/- |
| | एकुण | - | ८००००००/- | ८००००००/- |

**जि.प.चे सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक अवलोकनार्थ सभागृहात सादर करण्यात आले असता खालीलप्रमाणे चर्चा घडुन आली.**

**सन्मा. सदस्य श्री देवानंद न.पवार** यांनी अंदापत्रकातील पुष्ठ क्र. १४ /७ मधील मान्सूनपूर्व - दुरुस्तीसाठी दर्शविलेला जि.प.चा वाटा वाढविणे आवश्यक आहे, कारण शासनाकडून सदर निधी उशिरा मिळतो तरी तातडीची मदत देण्यासाठी टोकन निधी ठेवण्यात यावा. त्याचप्रमाणे पृष्ठ क्र. २ / ८ मध्ये डेस्क बेंच साठी टोकन ठेवण्यात यावा असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री.परशराम ग. डवरे** यांनी इ-क्लास जमीनीवरील शाळेचे इलेक्ट्रीक बील भरण्यासाठी अंदापत्रकीय तरतूद करण्यात यावी असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र के. ठाकरे** यांनी शाळेसाठी सतरंजी आवश्यक आहेत करिता अंदाजपत्रकात तरतूद ठेवण्यात यावी असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री देवानंद न.पवार** यांनी शाळेकरिता डेस्क बेंच खरेदीसाठी १३ व्या वित्तआयोगातून निधी उपलब्ध करुन देण्यासाठी ठराव घेऊन शासनाकडे पाठविण्यात यावा असे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन मा. अध्यक्ष यांनी उक्त प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याबाबतचे **निर्देश मु.ले.वि.अ.** यांना दिले.

**सन्मा. सदस्य श्री. मिलींद प्र. धुर्वे** यांनी १३ व्या वित्त आयोगामधुन शाळेला डेस्क बेंच दिल्याबध्दल अभिनंदन करण्यात येत असल्याचे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. मिलींद प्र. धुर्वे** यांनी ग्रामीण भागात विद्यार्थ्यांकरिता अभ्यासिका आवश्यक असल्याचे सांगुन त्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रमातून तरतूद करण्यात यावी असे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. अध्यक्ष** यांनी उक्त प्रकरणी जिल्हा नियोजन समिती कडे तसेच शासनाकडे प्रस्ताव पाठविणेबाबतचे **निर्देश मु.ले.वि.अ.** यांना दिले.

**सन्मा. सदस्य श्री. मिलींद प्र. धुर्वे** यांनी शाळेची प्रॉपर्टी चे रेकॉर्ड अद्यावत करण्यात यावे असे सांगीतले असता शिक्षणाधिकारी (प्राथ.) व कार्य अभि. बांध.क्र.१/२ यांनी प्रस्तुत विषयाचे अनुषंगाने काम सुरु करावे व पुढील सभेपुर्वी अहवाल सादर करणेबाबतचे निर्देश **मा. अध्यक्ष** यांनी सबंधित खातेप्रमुखांना दिले.

**सन्मा. सदस्य श्री. राहूल मा. ठाकरे** यांनी गुणवत्ता विकासासाठी अंदाजपत्रकात आवश्यकतेपेक्षा जादा तरतूद दर्शविण्यात आली आहे तरी त्या ऐवजी फक्त टोकन तरतुद करण्यात यावी व आवश्यकता वाटल्यास त्यामध्ये वाढ करावी. तसेच कार्यक्रम तयार नसतांना मोठया प्रमाणात तरतूद करण्यात येऊ नये असे मत व्यक्त केले.

**सन्मा. सदस्य श्री दिवाकर ध. राठोड** यानी सुधारित अंदाजपत्रकातील जि. प. इमारतीची दुरुस्ती व परिक्षण या बाबीवरील ठेवण्यात आलेली तरतुद रु.३३ लाख ही जादा होत असल्याने या ठिकाणी रु. २० लाख ठेवण्यात यावे. तसेच पंचायत समिती ला साहीत्य ठेवण्यासाठी गोडाऊन बांधकामाकरिता तरतुद निरंक असल्याने त्या ठिकाणी पाच लाखाचे टोकन ठेवण्यात यावे असे सांगीतले.

**मा. अध्यक्ष** यांनी पंचातय समिती सभापती निवासस्थान/बांधकामे दुरुस्तीसाठी रु. पाच लाख ठेवण्यात येत असल्याचे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न.पवार** यांनी कळंब व वडकी विश्रामगृहाचे बांधकाम करिता दरवर्षी तरतूद करण्यात येत असुन फक्त याच ठिकाणी खर्च केला जात असल्याचे सांगीतले. त्यावर **सन्मा. सदस्य श्री राहूल मा. ठाकरे** यांनी गरज नसल्यास सदरची तरतूद रद्द करण्यात यावी असे सांगीतले. **यावर मा. अध्यक्ष** यांनी उक्त विषयाचे अनुषंगाने टेंडर प्रोसेस झाली असल्यामुळे आता रद्द करता येणार नसल्याचे सांगीतले. **त्यावर सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी याबाबत आमच्या कॉंग्रेस पक्षातील सर्व सदस्यांचा सदरचे तरतूदीला विरोध असुन सर्वजण उभे राहून विरोध दर्शवित आहो असे सांगुन सदरचा निधी हा निधी शेतक-यांच्या लाभासाठी वापरण्यात यावा असे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. अध्यक्ष** यांनी दर्शविलेली तरतुद कमी करुन रु.५ लाख ठेवण्यात येत असल्याचे सभागृहास सांगीतले व ते सर्वानुमते मान्य करण्यात आले.

**सन्मा. सदस्य श्री. दिवाकर ध. राठोड** यानी सतरंजी खरेदी करिता केलेल्या तरतूदीला आमचा विरोध असल्याचे सांगीतले. तसेच **सन्मा. सदस्य श्री.प्रविण व. शिंदे** यांनी सतरंजी खरेदी करिता असलेली तरतुद मान्य नसल्याचे सांगीतले

**सन्मा. सदस्य श्री देवानंद न. पवार** दुर्धर रोगग्रस्त रुग्णांना आर्थिक सहाय्य या साठी दर्शविण्यात आलेल्या रु. पाच लाख तरतूदीत वाढ करुन ती तरतुद रु. ७ लाख करण्यात यावी असे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. अध्यक्ष** यांनी वेळीच पेशंटला मदत देण्यासाठी दवाखाने मंजुर करण्यात यावे तसेच एंबुलेन्स जिल्हयाबाहेर घेऊन जाण्याची परवानगी मिळावी यासाठी शासनाकडे पाठविण्याबाबतचा ठराव खालीलप्रमाणे सभेत मांडला.

**ठराव क्रं. ३ :- दुर्धर रोगग्रस्त रुग्णांना मदत देण्यासाठी दवाखाने मंजुर करण्यात यावे तसेच एंबुलेन्स जिल्हयाबाहेर घेऊन जाण्याची परवानगी मिळावी यासाठी ही सभा शासनास ठरावाव्दारे विनंती करते.**
**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**ठरावानुसार पुढील कार्यवाही जि.आ.अ. यांना करण्याबाबत ही सभा निर्देश देते.**

**मा. उप सभापती प.स. महागाव** यांनी विश्रामगृह व्यवस्थापन खर्च व देखभाल दुरुस्ती करिता दर्शविलेल्या तरतूदीत वाढ करण्यात यावी असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री दिवाकर न. राठोड** ८ यांनी दिग्रस पं.स. आवाराचे अंतर्गत देखभाल दुरुस्ती सुधारणा करणे याबाबी वरील दर्शविलेल्या सन २०१४-१५ या वर्षातील मुळ अंदाजपत्रकामधील दर्शविलेल्या तरतुदीत वाढ करण्यात यावी.

**सन्मा. सदस्य सौ. मंदाताई ज्ञा. गाडेकर** यांनी सन २०१४-१५ वर्षातील मुळ अंदापत्रकामध्ये दर्शविण्यात आलेल्या स्पायरल सेपरेटर ऐजवी एचडीपी पाईप पुरविण्यात यावे असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री राहूल मा. ठाकरे** यांनी लाभार्थ्यांना वस्तू स्वरुपात लाभ न देता थेट शेतक-यांच्या खात्यात पैशे जमा होतील, अशी प्रक्रीया करण्यात यावी व यासाठी जि.प.कडून पुढाकार घेण्यात यावा असे सांगीतले.

**मा.अध्यक्ष** यांनी शेळी प्रजनन साठी उत्तम प्रतिचा बोकड वाटप करणेकरिता २ लाखाचे तरतूद टोकन स्वरुपात ठेवण्यात यावे असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री देवानंद न. पवार** यांनी संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत विकास कामाची अंमलबजावणी करणे व जिवनोपयोगी साहीत्य पुरविणे करिता २५लाख +५ लाख याप्रमाणे तरतुद ठेवण्यात यावी असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य सौ.संगीताताई अ. राजूरकर** यांनी ९० टक्के अनुदानावर एचडीपी पाईप देण्यात यावे असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य सौ. सुलोचनाताई मो. भोयर** यांनी महीला व बालकल्याण विभागाकडून मुलींना अद्याप सायकली वाटप झालेल्या नाहीत असे सांगुन यावेळेस तरी सायकली वाटप करण्यात याव्यात असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री.पंढरी ह. सिंहे** यांनी मागिल वर्षीपासून सिलाई मशीनचे वाटप करण्यात आले नसल्याचे सांगुन या वर्षाच्या वाटपासोबत मागील सिलाई मशीनचे वाटप करण्यात यावे असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. राहूल मा. ठाकरे** यांनी या वेळेसची खरेदी प्रक्रीया करतांना निकृष्ट साहीत्य घेण्यात येऊ नये असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य सौ.ज्योती जि. ठेंगे** यांनी मागिल वर्षी ताडपत्रीचे वाटप करणार होते. परंतु अजूनही ताडपत्री चे वाटप करण्यात आलेले नाही असे सांगीतले.

**मा.अध्यक्ष** यांनी सिलाई मशीन व सायकली साठी वाढ करुन रु. १५ लाख ची तरतूद करण्यात येत असल्याचे सांगीतले.

**सन्मा. सदस्य सौ. मंदाताई ज्ञा. गाडेकर** यांनी सन २०१४ - १५ चे मुळ अंदापत्रकात इयत्ता ७ वी व १२ वी पास मुलींना एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षणासाठी दर्शविलेली तरतूद कमी करण्यात यावी असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य सौ. सुलोचनाताई मो. भोयर** यांनी खिचडी शिजविण्यासाठी सेविकांना बचत गटांकडून मोबदला मिळत नसल्याचे सांगून या साठी तरतूद ठेवण्यात यावी असे सांगीतले.

**सन्मा .सदस्य सौ. सिमाताई ल. तेलंगे** प्रशिक्षणासाठी तरतूद कमी करण्यात यावी. तसेच तालुक्याला प्रशिक्षण घेतांना आम्हाला माहिती देण्यात आली नाही. मागिल वर्षी तरतूद केली, खर्च कुठे केली, माहिती देण्यात यावी.